**प्रतिज्ञा हात धुण्याची**

. . . माझं गाव आहे, सारे गावकरी माझे बांधव आहेत. माझ्या गावावर माझं प्रेम आहे, माझ्या गावातील अनेक परंपरांचा मला अभिमान आहे. पण माझ्या गावाच्या आरोग्याला बाधक ठरणाऱ्या परंपरा मोडून काढण्याची पात्रता माझ्या अंगी यावी यासाठी मी सदैव प्रयत्न करीन, मी गावकऱ्यांना हात साबणाने न धुता अन्न सेवन केल्यास होणाऱ्या महाभयंकर परिणामांची माहिती देईन आणि वेळोवेळी साबणाने हात स्वच्छ धुण्याचे फायदे सांगेन. माझ्या गावातील कुणी साबणाने हात धुत नसेल तर ते माझे अपयश आहे. माझ्या गावाचे आरोग्य हे धोक्यात येवू नये यासाठी मी सदैव प्रयत्न करेन. त्यासाठी मी स्वतःपासून सुरुवात करण्याची शपथ घेतो, तसेच आमचे आरोग्य, अस्वच्छतेतून होणाऱ्या रोगांपासून मुक्ती, यातून होणारे कल्याण यातच माझे सौख्य समावले आहे.

**जय आरोग्य, जय स्वच्छता**

## हात धुणे गीत

सर्वात पहिले ओले करा हात

त्यावर करुद्या साबणाला नाच

हाताची हाताला होऊ द्या भेट

पुढे- मागे होऊ दे हाताला थेट

मग बोटांशी खेळण्याची येईल पाळी

तळ हातांवर नाचू द्या बोटांची मोळी

१...२...३...४ बोटं मोजा दहा

मळ नाही कुठे हे तपासून पहा

धुवून टाका हात मिळवीण्या रोगांपासून मुक्ती

स्वच्छ हातात तुमच्या आहे सारी शक्ती

# हात धुणे गीत



सर्वात पहिले ओले करा हात



त्यावर करुद्या साबणाला नाच



हाताची हाताला होऊ द्या भेट



पुढे- मागे होऊ दे हाताला थेट



मग बोटांशी खेळण्याची येईल पाळी



तळ हातांवर नाचू द्या बोटांची मोळी




१...२...३...४ बोटं मोजा दहा



मळ नाही कुठे हे तपासून पहा



धुवून टाका हात मिळवीण्या रोगांपासून मुक्ती



स्वच्छ हातात  तुमच्या आहे सारी शक्ती